# प्रकरण – 3

## साक्षरता अभियान योजना

### 3.1. प्रास्ताविक :

सातव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रस्तावनेत माजी पंतप्रधान कै.श्री. राजीव गांधी यांनी म्हटले आहे की, विकास हा केवळ कारखाने, धरणे आणि रस्ते यांच्याशी संबंधित नाही. विकास हा मूलतः लोकांच्या जीवनाशी संबंधीत आहे. लोकांची भौतिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रगती हे त्याचे ध्येय आहे. साक्षरता मानवी साधन संपत्तीच्या विकासात अत्यंत आवश्यक घटक आहे. साक्षरता ही अभिव्यक्ती, अध्ययन आणि ज्ञानप्राप्ति व माहिती मिळविणे व त्याचे आदान प्रदान करणे या साठी आवश्यक असून वैयक्तीक मूल्यमापन, वाढ आणि राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक असे साधन आहे.

### 3.2 भारतातील साक्षरतेचा धावता इतिहास :[29]

साक्षरता विषयक कार्याची जाणीव ही विसाव्या शतकात म्हणजे चालू शतकात निर्माण झाली.

निरक्षर लोकांना साक्षर करण्याचे प्रयत्नात मिशनरी, इंग्रज अधिकारी आणि आपल्या देशातील सामाजिक कार्यकर्ते असे विविध प्रकारचे लोक सहभागी झालेले होते. पहिले महायुध्द 1918 मध्ये संपले त्या सुमारास या प्रश्नाकडे अधिक लक्ष जाउ लागले सर्व देशभर निरक्षरांना साक्षर करण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्यातील काही ठळक व्यक्ती आणि संस्था यांनी केलेले प्रयत्न फार उल्लेखनीय आहेत.

---

29. प्रा.चंद्रकुमार डांगे. "राष्ट्रीय प्रौढ शिक्षण" गो.के.जोगळेकर, नूतन प्रकाशन. पुणे – 30 प्रथमावृत्ती 1978 पान नं. 1

श्री.एस्.जी.डॅनियल हे मद्रास प्रांतांत तंजावर येथे शाळाधिकारी होते. त्यांनी तमिळ भाषेतून मुलांच्या साठी आणि प्रौढांच्या साठी पाठयपुस्तके लिहिली ते स्वतः मुलांना सकाळी आणि स्त्रियांना दुपारी शिकवित. ग्रामिण भागातील निरक्षरांना साक्षर करण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात कै.रा.रा.भागवत यांनी मोठया जिददीने केला. त्यांनी काही तक्ते आणि सोपी पुस्तके तयार केली होती. भावनगर मध्येही एक फार मोठा प्रयोग तीन भाषांत केला गेला. या कार्यक्रमाचे नाव होते. भारतातील निरक्षरते विरुध्द धर्मयुध्द 'श्री.गिजुभाई बधेका यांच्या नेतृत्वाने गुजराथी, श्रीमती डोंगरे मराठीसाठी आणि श्रीमती खादिजा शफी तयबाजी उर्दू साठी अशा व्यक्तींनी साक्षरता प्रसाराचे कार्य केले.

1921 मध्ये पंजाबात साक्षरतेसाठी फार मोठी मोहीम सरकारने हाती घेतली. त्यात सरकारी व खाजगी शाळांतील शिक्षक सहभागी झाले होते. हे साक्षरता प्रसाराचे कार्य ज्यादा काम म्हणून केले जात असून वेतनात अल्प वाढ मिळे. दिवाबत्ती, पाटया, पेन्सीली इ. वरचा सर्व खर्च सरकार करत असे. या विषयाची आकडेवारी 1922 मध्ये 17776 लोकांनी नावे नोंदविली. पाच वर्षात हा आकडा 28434 पर्यत गेला पुन्हा 1934 पर्यत हा आकडा घसरत 5000 वर आला. मग शिकविण्याच्या नव्या पध्दती अंमलात आणल्यावर 1936 मध्ये पुन्हा 42000 वर संख्या गेली.

1937 मध्ये नॅशनल ॲडल्ट स्कूल युनियनने श्री.टी.एल्.सुबरम्रा यांना भारतात पाठविले होते. प्रौढांच्यात साक्षरता विषयक कार्य कसे वाढविता येईल यासंबंधी त्यांनी पुष्कळ मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणेने 1937 मध्ये इंडियन ॲडल्ट एज्युकेशन सोसायटी, दिल्ली ही संस्था निर्माण झाली. सर शहा सुलेमान संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. पहिली अखिल भारतीय प्रौढ शिक्षण परिषद दिल्ली येथे मार्च 1938 मध्ये झाली. बंगालमधील अनेक विद्यार्थी संघटना साक्षरता प्रसाराचे काम करीत होत्या.

1939 पूर्वी बिहार सरकारने अशीच एक फार मोठी चळवळ हाती घेतली. कलकत्याच्या व्याख्यानात श्री.बी.सी.मुकर्जी, डॉ.लॉबॅक यांनी फिलीपाईन्स

1939 पूर्वी बिहार सरकारने अशीच एक फार मोठी चळवळ हाती घेतली. कलकत्याच्या व्याख्यानात श्री.बी.सी.मुकर्जी, डॉ.लॉबॅक यांनी फिलीपाईन्स बेटामध्ये साक्षरता विषयक काम केले ते चित्र दाखवून सांगत होते. नव्या पध्दतीने कसे लौकर शिकता येते, हे पाहून श्रीमती मुकर्जी यांनी प्रभावीत होवून बिहार शिक्षण मंत्र्यांचे मन वळवून त्यांनी चळवळ सुरु करुन वर्ष संपायच्या आत जवळ–जवळ 3 लाख लोकांना साक्षर केले. या चळवळीचा एक विशेष म्हणजे गया येथील तुरुंगातील प्रत्येक कैदी वाचायला शिकला. तुरुंगाचे अधिकारी कर्नल जे.चंद्र यांनी साक्षर झालेल्या कैद्यांची एक पंचायत तयार केली त्यामध्ये 1. जेवण व्यवस्था 2. स्वच्छता 3. शिक्षण 4.ग्रंथालय 5. नैतिक आचरण. अशा पाच शाखा होत्या.

15 जानेवारी 1938 मध्ये संयुक्त प्रांतांच्या शासनाने साक्षरता मोहीम सुरु केली. त्यावेळी ना.श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने एक तरी निरक्षर व्यक्ती साक्षर करावी अशी शपथ घेण्याचे आवाहन केले. 21 जानेवारी 1938 मध्ये महाराष्ट्रातील औंध संस्थानच्या अधिपतींनीही अशाच एका मोहिमेला गती दिली.

1938 ते 1942 या कालखंडात बिहारमध्ये एक प्रचंड साक्षरता मोहिम हाती घेतली गेली. 1937 मध्ये मुबंईत प्रौढ शिक्षणाची योजना तयार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. 1939 मध्ये ग्रंथालय योजना आखण्यात आली. खेडगावातील ग्रंथालयांना रु.30 ते रु.50 पर्यंत अनुदा देण्याची व्यवस्था झाली. 1941–42 मध्ये मुंबई सरकारने प्रौढ शिक्षण कार्यकर्त्यांना शिक्षण देण्यासाठी दोन आठवडयांचे वर्ग उन्हाळी व हिवाळी सुटटीत काढले.

1942 ची राष्ट्रीय चळवळ उग्र होत चालली होती. सर्व प्रांतात प्रौढ शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली होती याचा परिणाम प्रौढ शिक्षणावर विपरीत झाला.

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. प्रौढ शिक्षणांसंबंधी नव्याने विचार सुरु झाला. 1948 मध्ये सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्ड ऑफ एज्युकेशनने एक समिती नेमली व या समितीच्या अहवालात प्रौढ शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता

135.5
A

मिळवून देणे नव्हे तर त्या शिक्षणात नागरिकत्वाचे शिक्षण, आरोग्य, शेती व इतर उपयुक्त हस्तव्यवसाय यांचाही अंतर्भाव असला पाहिजे. हे शिक्षण देण्यासाठी दृक–श्राव्य साधनांचा भरपूर उपयोग केला जाणे आवश्यक आहे.

1949 – 50 प्रांतांकडून आलेल्या अहवालावरुन असे दिसून आले की, सुमारे 5 लक्ष लोक साक्षर करण्यात आले. सर्व देशात एकूण 5 लक्ष 90 हजार समाज शिक्षण वर्ग चालू होते.

1951 मध्ये भारतात जेवढी निरक्षरता होती ती 1961 मध्ये आणखी वाढली. तर 1966 मध्ये 1961 पेक्षा 2 कोटी निरक्षरांची भरच पडली. लोकसंख्या वाढीच्या प्रचंड वेगाने सार्वत्रिक साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य होवू शकले नाही.

राष्ट्रीय प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम म. गांधीच्या जन्मदिनी म्हणजेच 2 ऑक्टोबर 1978 ला सुरु झाला. आपल्या देशात 1986 साली "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण " जाहीर झाले, त्यात संपूर्ण देशाने निरक्षरतेचे समूळ उच्चाटन केले पाहिजे असे म्हटले आहे. 15 ते 35 वयोगटातील निरक्षरांना साक्षर करण्यासाठी कटिबध्द झाले पाहिजे म्हणून सन.1988 साली केंद्र शासनाने ' राष्ट्रीय प्रौढ शिक्षण मिशनची' स्थापना केली आणि देशाच्या विविध भागात संपूर्ण साक्षरता अभियान सुरु करण्यात आले यात जिल्हा हा घटक मानण्यात आला.

## 3.3 साक्षरता म्हणजे काय? [30]

सर्वसाधारणपणे लोकांत असा गैरसमज आहे की, साक्षरता म्हणजे निरक्षरांना केवळ कांही अक्षरांची ओळख करुन देवून त्यांना स्वाक्षरी करण्यास शिकविणे. परंतु संपूर्ण साक्षरता अभियानाचा एवढा मर्यादित उद्देश नाही. तर निरक्षरांना अक्षर ओळख करुन देणे, त्यांचे शब्दज्ञान वाढविणे, शब्दाव्दारे वाक्ये जुळविणे, वाक्ये वाचणे, अर्थ समजून घेणे व लिहिणे या क्षमता त्यांच्यात निर्माण करणे म्हणजे विचार अभिव्यक्ती साठी त्यांना सक्षम बनविणे हे अपेक्षित आहे.

तसेच त्यांना अंकज्ञान करुन देणे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या गणितातील मुलभूत प्रकियांचा परिचय करुन देणे आणि रुपये पैसे, वनजमापे इत्यादी गोष्टींची ओळख करुन देणे व दैनंदिन व्यवहारात उपयोगी हिशोब करण्यास सक्षम बनवून त्यांच्यात कार्यात्मक साक्षरता निर्माण करणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यात्मक साक्षरता म्हणजे :

1. अक्षरज्ञान व अंकज्ञान क्षेत्रात स्वावलंबी बनविणे
2. आपल्या परिस्थितीचे आकलन होणे व त्याची कारणमीमांसा करता येणे, आणि विकास कार्यात सहभागी होवून संघटितरित्या परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणे.
3. मुख्यतः आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी नवी साधने व कौशल्ये संपादन करण्याची क्षमता निर्माण करणे.

---

30. 1. लातूर जिल्हा संपूर्ण, साक्षरता अभियान, अक्षरमाला 1992, पुष्प 1 ले , सवंगडी ग्रामसमन्वयाची मार्गदर्शिका पान नं. 7

2. नांदेड जिल्हा संपूर्ण साक्षरता अभियान, पुस्तकमाला 1992, पुष्प 1 ले "शिदोरी" स्वयंसेवकासाठी हस्तपुस्तिका पान नं –

4. राष्ट्रीय एकात्मता, स्त्री–पुरुष समानता, सामाजिक समानता, पर्यावरण संरक्षण, अंधश्रध्दा निर्मूलन, छोटया कुटुंबाचे महत्व यासारखी सामाजिक मूल्ये आत्मसात करणे.

### 3.4 साक्षरतेचा स्तर

साक्षरता अभियानांतर्गत शिकणा–या नवसाक्षरांचा साक्षरता स्तर निश्चित करणे अत्यंत महत्वाचे काम आहे. अर्थात नवसाक्षराने किमान क्षमता प्राप्त करण्यासाठी उद्दीष्ट निश्चित करणे आवश्यक आहे.

स्वाक्षरी पण विचारपूर्वक –

सही करता येणे हे मर्यादित व प्रसंगी अत्यंत धोकादायक उददीष्टय डोळयासमोर ठेवून आपल्याला हा उपक्रम राबविता येणार नाही. तर विचार करुन व बुध्दिला पटल्यानंतरच स्वाक्षरी करण्याची क्षमता प्राप्त करुन देणे हे उददीष्ट डोळयासमोर ठेवावे लागेल.

अक्षरांची ओळख करुन देत असताना प्रत्येक शब्द माझ्या नित्याच्या व्यवहाराशी निगडित आहे, जे मी शिकत आहे त्याने माझो जीवन अधिक सुकरपणे जगता येणे मला शक्य आहे असे वाटले पाहिजे. थोडक्यात जीवनोपयोगी शिक्षणाचे उदि्दष्ट डोळयासमोर ठेवून अध्ययनाचा स्तर निश्चित करणे आवश्यक आहे.

नवसाक्षराला गोडी तर वाटलीच पाहिजे. त्या शिवाय हे अध्यापन विशिष्ट कालमर्यादेत होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे विभागणी करता येईल.

राष्ट्रीय साक्षरता मिशनने ठरविलेल्या निकषानुसार हे स्तर ठरविले आहेत.

वाचन, लेखन आणि गणिताचे निश्चित केलेले मापदंड आहेत.

1. वाचन

अ. कुठल्याही पाठातील गद्य त्याच्या आवडीचा विषय असलेल्या भागातून पाच मिनीटाला 30 शब्द स्पष्ट व शुध्द उच्चारणे.

आ. परिवहन संकेत चिन्ह फलक सामान्य सूचना आणि नवसाक्षरासाठी प्रकाशीत वर्तमान पत्राचे सहजरित्या वाचन करता येणे.

इ. आपल्या व्यवसायाशी संबंधीत आणि आपल्या सभोवताली असलेल्या घटना संबंधीच्या बातम्या समजू शकतो.

2. लेखन :

अ. दर मिनीटाला सात शब्द समजून लिहीणे.

आ. दर मिनीटाला पाच शब्द श्रवण करुन अनुलेखन लिहिणे.

इ. दोन शब्दामध्ये विशिष्ट अंतर ठेवणे.

ई. शब्दासाठी असलेली सांकेतिक चिन्ह समजून त्याचा उपयोग करणे.

3. अंकगणित :

अ. 1 ते 100 पर्यंतचे लेखन आणि संख्या वाचन करता येणे.

आ. तीन अंकी संख्या एक हजाराच्या आतील पर्यंतची बेरीज, वजाबाकी 100 पेक्षा कमी गुणाकार आणि भागाकार करणे.

इ. किलोग्रॅम, मीटर, रुपये, पैसे, किलोमिटर आणि क्षेत्रफळ आणि वेळ घडयाळ समजणे.

ई. प्रमाण भाग / गुणोत्तर आणि व्याज या सारख्या गणिती कौशल्याचा व्यवहार्य उपयोग समजणे.

## 3.5 साक्षरतेसाठी जन आंदोलन

1991 च्या जनगणनेनुसार जगातील 38 टक्के निरक्षर जनता मागासलेल्या विकसनशील देशात आहे. भारतात आज निरक्षरता नाहीसे करण्याचे अनेक प्रयत्न चालू असून ही 50 कोटी लोक निरक्षर आहेत असा अंदाज आहे. 1951 मध्ये निरक्षरांची संख्या 30 कोटी होती, ती 1981 मध्ये 43.8 कोटी झाली. भारतासारख्या महान परंपरा असलेल्या आर्यभटट्, भास्कर, पाणिनी, पातांजली प्रभृतींना जन्म देणा–या देशाची आज काय दुर्दशा आहे? सर्वात अधिक अशिक्षितांचा देश म्हणून जगात आपण विक्रम साधलेला आहे.

ज्या स्वातंत्र्यासाठी आपल्या वाडवडिलांनी बलिदान केले ते स्वातंत्र्य बहुसंख्य निरक्षर व पीडित लोकांच्या दृष्टीने निरर्थक ठरत आहे. भारतात 1951 साली 18.33 टक्के साक्षरता होती ती 1961 साली 28.31 टक्के झाली, 1971 साली 34.45 टक्के होती, 1981 साली 43.56 टक्के व 1991 साली 52.11 टक्के आहे. पैकी पुरुष साक्षरतेचे प्रमाण 63.86 टक्के आहे व स्त्री साक्षरतेचे प्रमाण 39.42 टक्के आहे.

1981 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एका साक्षर स्त्री मागे दोन निरक्षर स्त्रिया असून 1991 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची साक्षरता टक्केवारी 54.38 टक्के असून पैकी पुरुष साक्षरतेचे प्रमाण 64.43 टक्के व स्त्री साक्षरतेचे प्रमाण 43.64 टक्के इतके आहे म्हणजे जवळ जवळ निम्मे लोक निरक्षर आहेत. त्यासाठीच महाराष्ट्र शासनाने अग्रक्रम देवून संपूर्ण साक्षरता अभियान मोठया प्रमाणात हाती घेतले आहे.

---

ASHISH BOSE "DEMOGRAPHIC DIVERSITY OF INDIA" 1991 CENSUS दुसरी आवृत्ती 1994. D.K. Publish Distributors (P) Ltd. 1 Ansari Road, Daryajang. New Delhi - 110002| पृष्ठ क.237

3.5.1. आजपर्यंतच्या साक्षरता मोहिमेचे यशापयश :

पूर्वी जेंव्हा सरकारने केंद्र आधारित साक्षरता कार्यक्रम राबविले तेंव्हा त्यामध्ये प्रत्येक केंद्रावर एक संघटक नेमलेला असे. 30 लोकांसाठी एक केंद्र अशी रचना होती. परंतु त्या कार्यक्रमात प्रेरक व संघटक यांच्यात प्रेरणेचा अभाव होता. निरक्षर लोकांतही प्रेरणेचा अभाव आढळून आला. वर्गात येणा–या प्रौढ निरक्षरांना वर्गात आणण्याची पूर्ण जबाबदारी त्या संघटकावर टाकण्यात आली होती. कारण त्या कार्यक्रमात लोकांचा सहभाग नव्हता.

व्यवस्थापकीय प्रोत्साहन अतिशय कमी असल्याने हा कार्यक्रम नेटाने पुढे जावू शकला नाही. दुसरा मोठया प्रमाणात हाती घेतलेला कार्यक्रम म्हणजे प्रत्येकाने एका व्यक्तीस साक्षर करण्याच्या कार्यक्रमात सर्व वर्ग विखुरलेले व प्रत्यक्ष पाहणे अशक्य होते. तसेच समाजाला समाविष्ट करणे व निरक्षरांना पुरेसे प्रोत्साहीत करणे अशक्य होते. सामुहिक चैतन्याच्या अभावामुळे हा कार्यक्रम ही यशस्वी होवू शकला नाही.

3.5.2 संपूर्ण साक्षरता :

आज हे अभियान पुढे जात असताना काहीजण प्राथमिक शिक्षणाची आज जी दुर्दशा आहे त्याकडे बोट दाखवितात. शाळा सोडणा–या मुलांची संख्या सतत वाढतच गेली तर निरक्षरतेचा प्रश्न तसाच कायम राहील हे खरे आहे, पण ज्यावेळी गावपातळीवर शेकडो वर्ग सुरु होतील तेंव्हा लोकांमध्ये शिक्षणबाबत जागृती निर्माण होईल व शेकडो पालक आपल्या मुलांच्या शिक्षणबाबत जागृत होतील. स्वतः प्रौढ शिक्षण वर्गात हजेरी लावणारे आई – वडील आपल्या मुलांच्या भवितव्याबाबत नक्कीच विचार करायला लागतील.

सरकारला निरक्षरता नाहीशी करण्यासाठी अनेक योजना आखूनही म्हणावे तसे यश आले नव्हते. परंतु केरळमध्ये अर्नाकुलम जिल्हा प्रथम साक्षर करण्यात यश आले व एक आशावादी विचार जनमाणसापर्यंत जावून पोहचला. त्या आधारे संपूर्ण केरळ राज्यात साक्षरतेसाठी "जन आंदोलना"ची आवश्यकता मान्य

झाली. काही लोकांनी असा विचार मांडला की, केरळमध्ये साक्षरतेचे प्रमाण पहिल्यापासूनच जास्त आहे. परंतु भारतातील अतिशय मागसलेल्या जिल्हयात उदा : मिदनापूरदुर्ग व ओरिसा राज्यातला अत्यंत अविकसीत जिल्हयात अनेक यशस्वी प्रयोग झालेल्या सर्व अनुभवांवरुन एक सिध्द झाले की, "अर्नाकुलम" चा नमुना सीनिक व भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन उपयोगात आणल्यास तो यशस्वी होतो.

देशात विविध ठिकाणी या अभियानाचे स्वरुप तन आंदोलनाच्या रुपाने पुढे नेत असताना याची काही ठळक वैशिष्टये लक्षात आली. पूर्वीच्या योजनेशी तुलना करताना या जन–आंदोलनाची ही मुलभूत वैशिष्टये कोणती ते समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

3.5.3 साक्षरता अभियानाची वैशिष्टये :

1. या अभियानामध्ये पूर्वीच्या योजनेसारख्या एखादा छोटा भाग उदा : खेडे, साक्षरतेकरिता न घेता व्यापक प्रमाणात संपूर्ण जिल्हा घेण्यात आला आहे.
2. संपूर्ण समाजाचा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात सहभाग आहे.
3. प्रामुख्याने स्वयंसेवी स्वरुप एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे.
4. नोकरशाही व स्वयंसेवी संस्था यांचा परस्पर समन्वय, सहकार्य लाभलेले आहे.
5. अत्यंत दृढ निष्ठा व जबर इच्छाशक्ती अपेक्षित आहे.
6. सहभागी होणा–यांच्या सामाजिक दृष्टीकोनातील बदल अपेक्षित आहे.
7. " नैराश्यातून आशावादाकडे" आणि आशावाद संसग्रजन्य व झपाटयाने पसरणारा आहे, अशी अभियानाची भूमिका आहे.
8. सामुदायिक आनंद ही अभियानाची एक उपलब्धी आहे.

3.6 जन आंदोलनाचे फलित :

या साक्षरता मोहिमेने साक्षरतेपेक्षा अधिक पुढच्या चळवळी प्रगत होण्याची क्षमता आपल्यात असल्याचे सिध्द केले आहे. यामुळे लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, आशावाद, व्यक्तीस्वातंत्र्य व आत्मविश्वासाची भावना निर्माण होईल व ही

चळवळ अक्षर शिकण्याच्या कितीतरी अधिक पुढे गेली आहे. ही चळवळ निरक्षराला दारिद्रय, दैववादापासून मुक्त करुन त्यांच्यात उज्वल भविष्यकाळाविषयी आत्मविश्वास निर्माण करत आहे. ही चळवळ मध्यम वर्गाची निराशेतून व औदासिन्यातून सुटका करेल. आज गाव पातळीपर्यंत रुंदावत गेलेली आर्थिक विषमतेची दरी व त्यामुळे सामाजिक तणाव याला ही चळवळ छेद देवू शकेल.

या जन आंदोलनाचे दुसरे वैशिष्टय म्हणजे साक्षरता मोहीम प्रत्येक गावा–गावातून पोहचली आहे. एक विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेला स्वयंसेवकांचा प्रचंड ताफा संस्कारीत होईल. विकासाच्या कुठल्याही प्रकियेत जर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग व स्थानिक पातळीवर नियोजन नसेल तर ती प्रकिया कुंठित होते. या अभियानाच्या नात्याने वस्ती–वस्तीवर, गाव पातळीवर प्रत्येक ठिकाणी एक कार्यकर्त्यांचा संच व जाळे तयार होईल. जो लोंकामध्ये जागृती निर्माण करील व स्थानिक पातळीवर लोकशाही भक्कम करण्याचे काम करील.

या अभियानात गावपातळीवर जे लाखो लोक सहभागी झाले आहेत त्यांच्यामध्ये शब्द लिहिण्याच्या बरोबर सामाजिक चेतना जागृत करणे व सांस्कृतिक जीवन उन्नत करण्यासाठी एक वेगळा प्रयत्न चालू आहे.

हळूहळू समाजाची मानसिकता बदलत जाणे व साक्षरतेच्या कार्यकमानंतर विकासाच्या अनेक योजनांमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग मिळवून देणे हे साक्षरोत्तर धोरणचा एक भाग आहे.

दलित, कष्टकरी, गरीब, अडाणी जनता जेंव्हा आपले हक्क व अधिकार जाणून घेईल, विकासाच्या योजनेच्या अंमलबजावणीत पुढाकार घेईल, तेंव्हा साक्षरतेचे मूळ उददीष्टय व त्याचा आपल्याला अभिप्रेत असलेला आशय लोकांच्या प्रत्यक्ष वृत्तीत उतरला आहे असे आपण म्हणू शकू. खेडयातील लाखो महिला आरोग्य, पर्यावरण, स्त्री–पुरुष समानता, देश, संस्कृतीची नवीन परिभाषा वापरायला लागतील तेव्हा ती परिवर्तनाची सुरवात असेल व अशी सुरुवात झालेली आहे. दूर डोंगरापलीकडे आपल्या जात्यावर साक्षरतेची ओवी म्हणणारी मात आपल्या मुलाला

शिक्षणापासून कसे वंचित ठेविल ? बेकार तरुण जेंव्हा साक्षरता स्वयंसेवक होईल तेंव्हा त्याचे गुणगुणनेही बदललेले असेल ही फक्त सुरुवात आहे.

## 3.7 संपूर्ण साक्षरता अभियनाचे स्वरुप आणि कार्यपध्दती

मागील अनेक वर्षात प्रौढ शिक्षण आणि साक्षरता हयांच्या कार्याचा अनुभव आशाजनक नाही.

सन 1978 मध्ये भारत सरकारने प्रौढ साक्षरतेचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्यानंतर सन 1988 मध्ये राष्ट्रीय साक्षरता मिशनची स्थापना करण्यात आली. या राष्ट्रीय साक्षरता मिशनने लोक विज्ञान चळवळ, केरळ शास्त्र साहीत्य परिषद आणि भारत ज्ञान विज्ञान तथा यांच्या अनुभवाच्या साहयाने संपूर्ण साक्षरतेसाठी सामाजिक मोहिम '' संपूर्ण साक्षरता अभियान सोलापूर'' या नावाने जिल्हयात चालू आहे. या मोहिमेची कार्यपध्दती स्वरुप आणि व्याप्ती खालील प्रमाणे आहे.

### 1. संपूर्ण साक्षरता मोहिमेचे स्वरुप

सोलापूर जिल्हा संपूर्ण साक्षरता मोहिमेमध्ये जिल्हा हा घटक मानला आहे. त्यामुळेच '' सोलापूर जिल्हा संपूर्ण साक्षरता अभियान'' समितीचे अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी साहेब आहेत. या जिल्हा समितीमध्ये या अभियानातील सहभागी समित्यांची रचना साधारणतः पुढीलप्रमाणे आहे.

### 2. जास्तीत जास्त समाजाचा सहभाग

या सामाजिक मोहिमेमध्ये समाजातील वेगवेगळया स्तरावरील लोकांचा सहभाग मिळविणे आवश्यक आहे आणि तो मिळविण्याचा प्रयत्न या अभियानाने बराचसा केलेला आहे. सोलापूर जिल्हा साक्षरता अभियान समितीच्या वतीने जिल्हा पातळीपासून ते ग्राम वाडी पातळीवरील समित्यामध्ये समाजातील वेगवेगळया स्तरावीरल लोकांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

3. जनजागरण व वातावरण निर्मिती :

कोणतीही मोहिम यशस्वी करणेसाठी योग्य त्या वातावरणची आवश्यकता असते. हीच वातावरणाची निर्मिती या संपूर्ण साक्षरता अभियान यशस्वी करण्याची पहिली पायरी होय. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात वातावरण निर्मितीस खालील बाबीस अग्रस्थान देण्यात आले.

अ. समाजातील प्रत्येक घटकाला अभियानात सहभागी करणे.

ब. साक्षर व्यक्तीला स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्याकरिता प्रोत्साहीत करणे.

क. निरक्षरांना साक्षर होण्यासाठी प्रयत्न करणे.

ड. अभियान काळात साक्षर स्वयंसेवक व निरक्षर नवशिका यांचा उत्साह कायम ठेवणे.

सोलापूर जिल्ह्यात वातावरण निर्मितीचा पहिला टप्पा 8 सप्टेंबर 1995 रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिना निमित्त औपचारिकपणे सुरु झाला. वातावरण निर्मितीमध्ये साक्षरता दिंडी, साक्षरतेवरील समुह, लोकनाटय, लोकनृत्य, पदनाटय, कलापथ, हळदी--कुंकवाचे कार्यक्रम, भजनी मंडळे, धार्मिक उत्सव व सण महिला मंडळांनी आयोजित करणे. पोस्टर्स, बॅनर्स, घोषवाक्ये लिहीणे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रांची प्रसिध्दी दिलेली आहे. तसेच महिला मेळावे, किशोरी मेळावे, मातृ प्रबोधन मेळावे, निरक्षर मेळावे, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यांचे गावचावडी कार्यक्रम, साक्षरता ज्योत, साक्षरतेची कावड, अक्षर गणेशोत्सव, अक्षर दिपावली, हस्तपत्रके, माहितीपत्रके आदि द्वारे वातावरण निर्मिती करण्यात आली.

---

31. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष संपूर्ण साक्षरता अभियान, सोलापूर. '' संपूर्ण साक्षरता अभियान – जिल्हा सोलापूर'' माहितीपुस्तक.

यामध्ये सरपंच युवक प्रतिनिधी, महिला मंडळाचे प्रतिनिधी, विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी, प्राथमिक शाळेतील विद्यार्थी, लोक प्रतिनिधी, समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक क्षेत्रात काम करणा–या संस्था, कलाकार, शिक्षक प्राध्यापक, पत्रकार, शासकीय अधिकारी, कर्मचारी आदि सर्वांचे सहकार्य घेण्यात आले. तसेच या साक्षरता चळवळींचा भार शासनाने प्रामुख्याने प्राथमिक शिक्षकांवर सोपविण्यात आलेली आहे त्यामुळे त्यांची भूमिका यामध्ये महत्वाची आहे.

4. स्वयंसेवक व निरक्षरांचे सर्वेक्षण :

प्राथमिक शिक्षकांचे मार्फत 15 ते 35 वयोगटातील निरक्षरांचा सर्वे करण्यात आला. यासाठी प्राथमिक शिक्षकांनी जनगणनेप्रमाणे घरोघरी जावून संपर्क साधून निरक्षर व्यक्तीचा सर्वे पूर्ण केला. सर्वेक्षणव्दारे उपलब्ध संपूर्ण आकडेवारी ग्राम पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत संघटित केली गेली आहे. या प्रत्येक प्राथमिक शाळेत त्या त्या स्थानिक भागाची तर केंद्र शाळेत संपूर्ण केंद्राची सांख्यकीय माहिती उपलब्ध आहे. तालुका पातळीवर संपूर्ण तालुक्याची तर जिल्हयाच्या ठिकाणी प्रत्येक तालुकावार सर्वेक्षणाची सांख्यकीय माहिती उपलब्ध आहे.

5. प्रशिक्षण योजना :

" आपल्या जिल्हयात 15 ते 35 वयोगटातील निरक्षरांची संख्या 275503 असून त्यापैकी पुरुष 101727 व स्त्रिया 173776 आहेत तर केवळ उत्तर सोलापूर तालुक्यात 15 ते 35 वयोगटातील निरक्षरांची संख्या 17806 निरक्षरांना शिकविण्यासाठी 1780 स्वयंसेवकांची गरज होती. म्हणजेच दहा निरक्षरांमागे एक स्वयंसेवक या प्रमाणात आपल्याला स्वयंसेवक तयार करावे लागले. या 1780 स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी साधारणतः तीस स्वयंसेवकांमागे एक प्रशिक्षकाची आवश्यकता होती म्हणजेच उत्तर सोलापूर साक्षरता अभियानात जवळपास 51 प्रशिक्षक संख्या होती या 51 प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी साधन व्यक्तींची गरज

होती व या साधन व्यक्तींच्या प्रशिक्षणासाठी मुख्य साधन व्यक्तींची गरज होती व या सर्वांना 4 + 4 + 2 +2 दिवसाचे प्रशिक्षण दिले गेले. मार्गदर्शक टप्पा, शिक्षक प्रशिक्षण टप्पा , प्रशिक्षक प्रशिक्षण टप्पा असे प्रशिक्षण दिले गेले.

6. शैक्षणिक साहित्य :

राज्य प्रौढ शिक्षण संस्था यांच्या द्वारा प्रौढ निरक्षरांना साक्षर करण्याकरिता अक्षरधारा त्रिस्तरीय शैक्षणीक साहित्य मोफत उपलब्ध करुन दिले गेले. शैक्षणिक पाठयक्रम अशा प्रकारे तयार करण्यात आला की, 200 तासाच्या शिक्षणाव्दारे एका प्रौढाला साक्षरता या क्षेत्रात स्वावलंबी करता येते. याशिवाय स्लेट पाटी, पेन्सिल, वही मोफत उपलब्ध करुन दिली आहे. स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका, गुंडाळी फळा, खडू, हजेरीपुस्तीका पुरविल्या गेल्या आहे.

7. निरीक्षण पर्यवेक्षण मूल्यांकन आणि व्यवस्थापन :

कोणत्याही योजनेचे व्यवस्थापन उत्तम दर्जाचे गतीमान कार्यक्षम, असेल तर सदर योजना यशस्वी होते. अर्थात संपूर्ण साक्षरता अभियानाच्या व्यवस्थापनाकरिता जिल्हा स्तरावर साक्षरता समितीची स्थापना केली असून या समितीचा कारभार साक्षरता अभियान समिती, सोलापूर मार्फत पाहिला जात आहे. तसेच अभियान यशस्वी होणे साठी जिल्हापातळीवर विविध सहा समित्या निर्माण केलेल्या असून यामध्ये शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार, वर्तमानपत्रांचे संपादक, समाजसेवक यांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रत्येक समितीला त्यांच्या कामाचे स्वरुप व काही मार्गदर्शक तत्वाची माहिती दिलेली आहे.

तालुका पातळीवर तालुका साक्षरता समिती स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्ष विधानसभा सदस्य किंवा प्रमुख सामाजिक कार्यकर्ते / शिक्षणतज्ञ आहेत. पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी सचिव म्हणून काम पाहतात व इतर सदस्यांमध्ये जिल्हा पातळी प्रमाणे समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण पातळीवर ग्रामसाक्षरता अभियान समिती ही पायाभूत समिती आहे. यामध्ये सरपंच,

स्थानिक प्रमुख व्यक्ती, स्थानिक प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, महिला मंडळाचे प्रतिनिधी सेवानिवृत्त कर्मचारी, दानशूर व्यक्ती, तरुण मंडळे, गणेश मंडळे, कीडा मंडळ प्रतिनिधी यांचा समावेश केला आहे. सदर समिती मार्फत स्वयंसेवकांच्या मदतीने वातावरण निर्मिती, प्रत्यक्ष प्रशिक्षण व शिक्षणाचे काम हाती घेतले आहे.


जनतेच्या संपूर्ण सहभागावर देखरेख ठेवण्यासाठी ग्रामीण, विभागीय, तालुका व जिल्हा पातळीवर लोक प्रतिनिधी यांच्या समिती स्थापन करण्यात आल्या असून या समित्यांचे कामकाज नियोजनबध्द चालणेसाठी जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती तर्फे व त्यांचे कार्यालयांतील प्रकल्प अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी, पर्यवेक्षक यांचे मदतीने लक्ष ठेवले गेले आहे.

ग्रामीण स्तरावरील माहिती प्राथमिक शिक्षकांचे कडून केंद्र प्रमुखांकडे त्यांच्याकडून विभागीय शिक्षणविस्तार अधिकारी यांचे मार्फत गटशिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविली जाते.

साक्षरता वर्गावर नियंत्रण स्थानिक शिक्षकामार्फत, बीटचे शिक्षणविस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका ग्राम अभियान समितीव्दारे ठेवण्यात आले आहे. भारत ज्ञान विज्ञान समितीचे मदतीने या अभियानात आस्था असणारे व पूर्णवेळ देवू शकणा--या व्यक्ती जिल्हा, तालुका व विभागीय पातळीवर नेमले गेले.

राष्ट्रीय साक्षरता मिशन यांचे मार्गदर्शक तत्वानुसार निरक्षर व्यक्ती साक्षर झाला किंवा कसे याचे मूल्यमापन केले जात आहे. तथापि अंतर्गत मूल्यमापन शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचे तर्फे करण्यात आले असून अक्षरधारामध्ये विहित पध्दतीची अंमलबजावणी केली गेली आहे.

सहभागी समित्या, जिल्हा प्रशासन, मोहिमेतील कार्यकर्त्यांची यंत्रणा यांना फारच महत्त्वाचे स्थान आहे.




**<u>साक्षरता मोहिमेत सुशिक्षीतांची भूमिका</u> :**

3.8 राष्ट्रीय साक्षरता मिशनद्वारे संपूर्ण साक्षरता अभियानाची मोहिम सध्या देशभर युध्दपातळीवर सुरु आहे. परंतु हा कार्यक्रम नेमका काय आहे त्याची उद्दीष्टे काय आहेत. त्यामध्ये आपली भूमिका नेमकी काय आहे, याची फारशी जाणीव सुशिक्षीतांना नाही ही दुर्दैवाची बाब आहे. साक्षरतेचा कार्यक्रम हा संपूर्ण साक्षरतेसाठी राबविला जात असून त्यामुळे देशाचा विकास होण्यास मदत होते. साक्षर व्यक्ती आपले कुटुंब मर्यादित ठेवते. त्यामुळे भावी काळातील लोकसंख्या वाढीचे प्रश्न निर्माण होत नाही. साक्षर व्यक्ती मुलां--मुलींच्या शिक्षणाविषयी जागरुक राहते. त्यामुळे सर्वांना प्राथमिक शिक्षण ह्या कार्यक्रमाला मदत होते. साक्षर व्यक्ती

आपली आणि कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेते. त्यामुळे समाज आरोग्य संपन्न होतो. त्याचप्रमाणे चिकित्साक व्यवहार, अन्यायारा प्रतिकार, अर्थोत्पादन वाढते. अशा प्रकारे आर्थिक सामाजिक विकासाला साक्षरता मदत करते आणि या स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे जनतेचे कल्याण व देशाचा सर्वांगिण विकास यासाठी साक्षरता अभियान सर्वांनी राबविणे अत्यंत आवश्यक आहे. कारण यापूर्वीही साक्षरतेबाबत कार्यक्रम राबविला तर इ.स.2000 पर्यंत जगातील सर्व निरक्षरांपैकी निम्मे निरक्षर एकटया भारतामध्ये असतील असा अंदाज आहे.

आपण सोलापूर जिल्हयाचा विचार केला तर असे दिसून येते की, सोलापूर जिल्हयामध्ये जवळ--जवळ तीन लाख निरक्षर आहेत यासाठी जिल्हयामध्ये एक विश्वस्त समिती व एक कार्यकारी समिती नियुक्त केली आहे. तसेच तालुका पातळीवर, गाव पातळीवरही विविध समित्या स्थापन केलेल्या आहेत. 30000 स्वयंसेवक व 2000 प्रशिक्षणार्थी कार्यरत असून या सर्वांच्या माध्यमातून वातावरण निर्मीती, प्रशिक्षण, तसेच साक्षरते संबंधीचे सर्व कार्य केले आहे.

जिल्हयातील कलेक्टर व त्यांची सर्व यंत्रणा, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्यांची सर्व यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, विविध कार्यकर्ते, तरुण मंडळे, महिला मंडळे, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी इतर विभागांचे कर्मचारी हे सगळे जण यात सहभागी आहेत. लोक प्रतिनिधी यात भाग घेतात. ते सभेला येतात, मार्गदर्शन करतात. शिवाय जमेल ती मदतही करतात. तसेच कोणी साहित्य देतो, कोणी संघटन करतो, देखरेख करतो, कोणी लोककलांचे कार्यक्रम करतो, प्रशिक्षण देतो व्याख्याने देतो. हे सगळेजण विना मोबदला काम करतात.

परंतु हा कार्यक्रम जिल्हा परिषदे अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक विभागांमार्फत, शाळामधून त्यांच्या करवी मोठया प्रमाणात राबविला जात आहे. त्यामुळे इतर सुशिक्षितांना हा कार्यक्रम काय आहे याची जाणीव नाही. याबाबतीत त्यांची उदासिनता दिसून येते. परंतु समाजातील सुशिक्षितांनी या कार्यक्रमात एक आंदोलन म्हणून झोकून देवून काम केले तरच यश येईल. त्यापैकीच आपण सर्वजण

आहोत. आपण आपली बुध्दी, वेळ आणि श्रम दिल्यास कार्यक्रम यशस्वी होईल. हा कार्यक्रम केवळ सरकारी कार्यक्रम नाही तर तुमच्या आमच्या सर्वांचाच आहे. आपण सर्वजण हे काम एकत्रपणे करु या ही भावना सुशिक्षितांमध्ये येणे आवश्यक आहे व देशाचा एक जबाबदार नागरिक या नात्याने हेच आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

सारांश :

साक्षरतेचे दृश्य परिणाम अल्पावधित लक्षात येत नाहीत तर हळूहळू त्याचे परिणाम दिसू लागतात म्हणून साक्षरतेचे महत्व लोकांना पटकन् पटत नाही हे एक समाजशिक्षण आहे. यासाठी योग्य वातावरण निर्मिती करुन हे अभियान उत्तर सोलापूर तालुक्यात राबविण्यात आले. साक्षरता अभियानात प्राथमिक व माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते, पत्रकार सहभागी झाले होते. परंतु एवढयाच लोकांकडून हा कार्यक्रम यशस्वी करावयाचे ठरविले तर जास्त कालावधी लागेल यासाठी एका सुशिक्षित व्यक्तीने जर एका निरक्षरास साक्षर करण्याचा संकल्प करुन सिध्दीस नेला तर कोणावरही बोजा न पडता आपण संपूर्ण साक्षरता अभियानाचे उद्दीष्ट सहज गाठू शकतो.

# संदर्भ ग्रंथ सूची


1. BOSH ASHISH : "DEMOGRAPHIC DIVERSITY OF INDIA" 1991. CENSUS , 2nd Addition 1994. [ D.K.Publishers Distributors (P) Ltd. Daryaganj, New Delhi-2]

2. प्रा. डांगे चंद्रकुमार : "राष्ट्रीय प्रौढशिक्षण" गो. के. जोगळेकर, नूतन प्रकाशन, पुणे – 30, प्रथमावृत्ती – 1978

3. रावंगडी : ग्रामरामन्वयाची मार्गदर्शिका लातूर जिल्हा संपूर्ण, साक्षरता अभियान, अक्षरमाला 1992, पुष्प 1 ले ,

4. शिदोरी : स्वयंसेवकासाठी हस्तपुस्तिका नांदेड जिल्हा संपूर्ण साक्षरता अभियान, पुस्तकमाला 1992, पुष्प 1 ले

5. जिल्हाधिकारी तथा –अध्यक्ष. संपूर्ण साक्षरता अभियान, सोलापूर. : "संपूर्ण साक्षरता अभियान जिल्हा सोलापूर. ," माहितीपुस्तक